संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक माणदेशी बुलंद आवाज..

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com


एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे
श्राव्या डायग्नोस्टिक्स
डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर, आटपाडी
उपलब्ध सुविधा
डॉ.सौ. चैताली सतेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)
डॉ. सतेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M.S.)
* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफिद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफिद्वारे उपचार
पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

वर्ष : ६ वे ● ● अंक : १११ ● ● शनिवार दि. ०९ मार्च २०२४ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021

# हे शासन सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडविणारे शासन

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे : शासन आपल्या दारी कार्यक्रम इस्लामपूरात संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : शासन आपल्या दारी हा उपक्रम लोकाभिमुख असून सर्वसामान्य माणसांच्या जीवनात बदल घडविणे, हे या योजनेचे उद्दिष्ट आहे. हे सरकार गोरगरिबांचे, कष्टकऱ्यांचे, शेतकऱ्यांचे सरकार असून त्यांना न्याय देण्यासाठी शासन आपल्या दारी च्या माध्यमातून थेट योजनाच लाभार्थ्यांपर्यंत आणण्यासाठी हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राज्यभर घेतला. राज्यात सुमारे साडेचार कोटी लाभार्थ्यांना शासनाच्या वतीने विविध लाभ देण्यात आले. म्हणूनच हे शासन सर्वसामान्यांच्या जीवनात बदल घडविणारे सर्वसामान्यांचे शासन आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

शासन आपल्या दारी या उपक्रमाचे आयोजन इस्लामपूर हायस्कूल मैदानावर करण्यात आले होते. यावेळी व्यासपीठावर पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, खासदार धैर्यशील माने, आमदार सुधीर गाडगीळ, माजी मंत्री अण्णा डांगे, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सुनिल पवार, अपर जिल्हाधिकारी डॉ.स्वाती देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते.

ते पुढे म्हणाले की, शासन आपल्या दारी उपक्रमांतर्गत जास्तीत जास्त



**सांगली : इस्लामपूर येथे शासन आपल्या दारी कार्यक्रमात बोलताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

गरजू लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी जिल्हा प्रशासनातील सर्व अधिकारी-कर्मचारी जोमाने कामाला लागले. त्याचाच परिणाम म्हणून सांगली जिल्ह्यात ३५ लाख ६५ हजार लाभार्थ्यांची नोंदणी झाली. राज्यातील शेतकरी, सर्वसामान्य माणूस, गरजू, वंचित अशा सर्वांना लाभ देण्यासाठी सर्व स्तरावरून प्रयत्न सुरू झाले. महिला सक्षमीकरणासाठी हे शासन सर्व प्रकारे प्रयत्नशील आहे. राज्य सरकारला केंद्र शासनाचे सहकार्य मिळत असल्याने राज्याचा विकास चौफेर होतोय. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशातील सुमारे २५ कोटी जनतेला दारिद्र्यरेषेच्या वर आणण्याचे काम केले आहे. दुष्काळी भागासाठी वॉटर ग्रीड करण्याचा निर्णय घेतला. आजपर्यंत ५०० निर्णय घेतले. आत्तापर्यंत १५ लाख हेक्टर जमीन सिंचनाखाली आणण्याचं काम आपल्या सरकारने केले. सरकारने लेक लाडकी योजना सुरू केली. तसेच ५ लाखापर्यंतचे मोफत उपचार देण्याचा निर्णय घेतला. तर उद्योग व्यवसाय वाढीसाठी सरकारने पाच लाख कोटीचे करार केल्याचे सांगून त्याचा चांगला परिणाम लवकरच दिसेल. सांगली जिल्ह्यातील चांदोली प्रकल्पग्रस्तांचे प्रश्न सोडवण्यासाठी लवकरच बैठक घेणार असल्याचे ते म्हणाले.

पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले की, सांगली जिल्ह्याचे नाव काढलं डोळ्यासमोर येतो तर या जिल्ह्याने लढलेला स्वातंत्र्यसंग्राम आणि मोठमोठे उद्योजकही या मातीत घडले अनेक नामवंत व्यक्तिमत्व या मातीमध्ये आणि म्हणून अनेक उत्तम प्रशासक अधिकारी दूरदृष्टी असलेले नेते सामाजिक नेते राजकीय नेते या मातीने घडवले. राज्य सरकारच्या भक्कम पाठिंब्यामुळे सांगलीची विकासाकडे जोमाने वाटचाल सुरू आहे. यावेळी खासदार धैर्यशील माने यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार घालून करण्यात आली तसेच सभामंडपात आल्यानंतर मुख्यमंत्र्यांनी मोबाईल टॉर्च दाखवून आणि त्याला उपस्थित नागरिकांनीही आपल्या मोबाईलचा टॉर्च सुरू करून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. या कार्यक्रमात विविध लाभार्थ्यांना प्राथमिक स्वरूपात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसेच पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे व अन्य मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना शासकीय योजनांचा लाभ देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमासाठी विविध शासकीय विभागांच्या प्रमुखांसह हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

## निवास कोळपे, मोनिका कोळपे यांचा सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : जलसंपदाच्या स्थापत्य विभागात सहाय्यक अभियंता म्हणून निवड झालेले मिटकीचे निवास जगन्नाथ कोळपे यांचा तसेच प्राथमिक शिक्षण विभागात शिक्षक म्हणून गोंदिया जिल्ह्यात निवड झालेल्या मिटकीच्याच मोनिका आकाराम कोळपे यांचा सत्कार मिटकी ग्रामस्थांच्या वतीने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे खानापूर विधानसभा मतदार संघाचे अध्यक्ष सुशांत देवकर आणि


**आटपाडी : मिटकी : येथे निवास जगन्नाथ कोळपे व मोनिका आकाराम कोळपे यांच्या सत्कार प्रसंगी उपस्थित सुशांत देवकर, आनंदरावबापू पाटील, सादिक खाटीक, जगन्नाथ कोळपे, जालिंदर कटरे व उपस्थित मान्यवर**

राष्ट्रवादी पक्षाचे आटपाडी तालुका अध्यक्ष आनंदरावबापू पाटील यांच्या हस्ते फेटा शाल श्रीफळ हार घालून सत्कार करणेत आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे प्रदेशचे उपाध्यक्ष सादिक खाटीक यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रारंभी स्वागत प्रास्ताविक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष जालींदर कटरे यांनी केले. यावेळी माजी उपसभापती हणमंतराव पडळकर, सांगोलेचे माजी उपसरपंच विजय बाबर, संजयशेठ निकम, ग्रा.पं.सदस्य प्रवीण बाबर, अनिल बाबर, बनपूरीचे दत्ता यमगर, शरद सोन्नूर धुळाजी ठेंगले, मिटकीचे माजी सरपंच दादा कोळेकर, माजी सरपंच यशवंत कोळपे, माजी सरपंच दुर्योधन कोळपे, चंद्रकांत कोळपे, ग्रा.पं.सदस्य आबा यमगर, माजी उपसरपंच संतोष जरग, नवनाथ कटरे, मोहन कटरे, अण्णा कोळेकर, रंगनाथ कोळपे, प्रभती कोळेकर, पोपट कोकरे, संजय कोकरे, ऋतिक पडळकर, बाळूमामा देवस्थानचे पुजारी संजय यमगर, गणेश घुटुकडे, महालिंग पडळकर, बाळासाहेब पडळकर इत्यादी अनेक जण उपस्थित होते. शेवटी आभार चंद्रकांत कोळपे यांनी मानले.

## अॅड.मीनल कुलकर्णी यांनी विधी विषयात पीएचडी

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : येथील अॅड. मीनल विनीत कुलकर्णी यांनी विधी विषयात पीएचडी (आचार्य) मिळवली आहे. अॅड. मीनल कुलकर्णी यांनी विवाहानंतर सासू डॉ. वैशाली कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून फलटण येथील प्रियदर्शनी लॉ कॉलेजमधून अभ्यासक्रम पूर्ण केला. त्यानंतर दहिवडी, वडूज व म्हसवड येथे वकिली करण्यास सुरुवात केली. याशिवाय राष्ट्रीयकृत बँकेच्या सल्लागार म्हणूनही त्या काम पाहत आहेत. पुढे त्यांनी पुणे येथील भारती विद्यापीठातून एलएमएमची पदवी पूर्ण केली. सन २०२० मध्ये त्यांनी भारत सरकारच्या नोटरी होण्याचा मानही मिळविला.

अमरावती येथील संत



**म्हसवड : अॅड.मीनल कुलकर्णी यांनी पीएचडी पदवी बहाल करताना मान्यवर**

गाडगे बाबा विद्यापीठात त्यांनी पीएचडीसाठी ऍडमिशन घेतली होती. ह्यूमन राइट्स या विषयांतर्गत सस्टेनेबल डेव्हलपमेंट इन इंडिया या विषयावर त्यांनी प्रबंध तयार करून सादर केला. या प्रबंधानुसार विद्यापीठाकडून त्यांना वकिलीतील पीएचडी (आचार्य) पदवी नुकतीच बहाल करण्यात आली.

या यशासाठी डॉ.पंजाबराव देशमुख, अमरावती लॉ कॉलेजचे मार्गदर्शक डॉ. भाग्यश्री देशपांडे तसेच गाडगेबाबा विद्यापीठाचे डॉ. व्ही.एस.चौबे यांचे त्यांना मार्गदर्शन लाभले. या यशाबद्दल दहिवडी वकील संघ, दहिवडी व गोंदवले ग्रामस्थांनी अभिनंदन केले.

## स्वेरीत ऑनलाईन सीईटी 'क्रॅश कोर्स'चे आयोजन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

पंढरपूर : 'स्वेरीज् कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पंढरपूर कडून येत्या सोमवार, दि.११ मार्च २०२४ पासून ते रविवार, दि. ३१ मार्च २०२४ पर्यंत ऑनलाईन सीईटी 'क्रॅश कोर्स'चे आयोजन करण्यात आलेले असून यामध्ये अभियांत्रिकी प्रवेशाच्या दृष्टीने महत्वाच्या असलेल्या फिजिक्स, केमिस्ट्री आणि मॅथ्स या तीन विषयांवर स्वेरीतील तज्ञ प्राध्यापक मार्गदर्शन करणार आहेत. हा 'क्रॅश कोर्स' मोफत असून यामध्ये बारावी सायन्सची परीक्षा दिलेले विद्यार्थी यामध्ये सहभागी होऊ शकतात. तसेच या 'क्रॅश कोर्स' नंतर स्वेरी मध्ये 'मॉक सीईटी'चे देखील आयोजन करण्यात आले आहे. तरी विद्यार्थ्यांनी या अनमोल संधीचा लाभ घ्यावा.' असे आवाहन स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे यांनी केले आहे.

शासनाच्या सी.ई.टी. सेलकडून बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांची सीईटी परीक्षा नियोजित वेळापत्रकानुसार घेतली जाणार आहे. पीसीएम ग्रुपची सीईटी परीक्षा दि.२५ एप्रिल ते ३० एप्रिल २०२४ दरम्यान घेतली जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेल्या एमएचटी- सीईटी २०२४ या परीक्षेची तयारी कशी करावी? यासाठी




अभ्यासक्रम कोणता? याचे स्वरूप असे सीईटी परीक्षेसंबंधी अनेक प्रश्न विद्यार्थ्यांना पडतात आणि हाच धागा पकडून स्वेरीने या मोफत ऑनलाईन 'क्रॅश कोर्स'चे आयोजन केले आहे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी मानून त्यांच्या हिताच्या बाबी लक्षात घेवून आणि शैक्षणिक गरजांना अनुसरून 'स्वेरी' नेहमीच नवनवीन शैक्षणिक उपक्रम राबवत असते. त्याचाच एक भाग म्हणून 'स्वेरी'ने बारावी सायन्सच्या विद्यार्थ्यांसाठी या 'क्रॅश कोर्स'चे आयोजन केले आहे. 'विद्यार्थ्यांना या ऑनलाइन 'क्रॅश कोर्स'च्या माध्यमातून 'एमएचटी- सीईटी २०२४' या परीक्षेच्या तयारीची व सरावाची संधी मिळणार आहे. तरी या सुविधेचा विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा.' असे आवाहन प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे यांनी केले आहे. 'विद्यार्थ्यांनी 'क्रॅश कोर्स' साठी आपले नाव नोंदवण्यासाठी मोबाईल क्र. ९५९५९२११५४ व ९१६८६५५३६५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन अभियांत्रिकी प्रवेश प्रक्रियेचे अधिष्ठाता प्रा. करण पाटील यांनी केले आहे.

## आटपाडीत सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

आटपाडी/प्रतिनिधी : जागतिक महिला दिनानिमित्त आटपाडीत सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. सहकार भारती व चौंडेश्वरी पतसंस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमास सहकार भारतीचे महामंत्री सतीश भिंगे, सांगली जिल्हा पतसंस्था फेडरेशन संचालक सुधीर देशमुख, तालुकाध्यक्ष बाबासाहेब माळी, उपाध्यक्ष चंद्रकांत दौंडे, चौंडेश्वरी पतसंस्थेचे व्हा. चेअरमन योगेश रणदिवे, सचिव बालक डोईफोडे, पतसंस्था प्रकोष्ठ दत्तात्रय स्वामी यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन महिलांच्या हस्ते करण्यात आले सांगली जिल्हा पतसंस्था फेडरेशनच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल सुधीर देशमुख यांचा सत्कार चंद्रकांत दौडे यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी बोलताना सतीश भिंगे म्हणाले, सहकार भारती देशात सहकारी संस्थांना प्रशिक्षण देत आहेत मार्गदर्शन करत आहे या संस्थेचे संस्था प्रतिनिधी म्हणून सभासद व्हावे, चंद्रकांत दौडे म्हणाले, सहकार भारतीच्या माध्यमातून महिलांच्या अडीअडचणी सोडण्याचा प्रयत्न केला जाईल. सुधीर देशमुख म्हणाले, पतसंस्था फेडरेशन मार्फत थकीत कर्जाची वसुलीसाठी दावे दाखल करावेत, फेडरेशनचे सभासद व्हावे. आटपाडी तालुक्यात सहकार भारतीचे चांगले काम आहे. या कामाची दखल नागपूर येथे झालेल्या राज्य कार्यकारिणी सभेत घेतली याचा आम्हाला अभिमान असल्याचे बाबासाहेब माळी म्हणाले.

सहकारी पतसंस्थेमध्ये काम करणाऱ्या महिलांना प्रथमच सहकार भारती तर्फे जागतिक महिला दिन निमित्त सन्मान करण्यात आला. त्यामुळे महिला कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळाले. घर सांभाळून


**आटपाडी : चौंडेश्वरी पतसंस्था येथे सहकार क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांच्या सन्मान प्रसंगी उपस्थित चंद्रकांत दौंडे, बालक डोईफोडे, बाबासाहेब माळी, सतीश भिंगे व उपस्थित मान्यवर**

सहकारी संस्थेत काम करत असताना होणारा सन्मान निश्चितच आयुष्यात आनंद देणारा ठरला आहे असे मनोगत वनिता देशमुख, आसमा वंजारी, भंडारे आदी महिलांनी व्यक्त केले. दत्तात्रय स्वामी यांनी सूत्रसंचालन, बालक डोईफोडे यांनी संयोजन तर तुकाराम जाधव यांनी आभार मानले.

## मुंबई येथे १९ मार्च रोजी डाक अदालत

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : भारतीय डाक विभागाची सर्कल स्तरावरील डाक अदालत दि. १९ मार्च २०२४ रोजी दुपारी ३ वाजता मुख्य पोस्टमास्तर जनरल, महाराष्ट्र सर्कल, मुंबई यांच्या कार्यालयात आयोजित केली आहे. तक्रारी स्विकारण्याचा अंतिम दि. ९ मार्च २०२४ आहे. अशी माहिती प्रवर डाक अधिक्षक सांगली यांनी दिली.

पोस्टाच्या सेवेविषयी किंवा कामकाजाबद्दल ज्या तक्रारींचे निवारण सहा आठवड्यांच्या आत झालेले नसेल व समाधानकारक उत्तर मिळाले नसेल अशा तक्रारींची डाक अदालतमध्ये दखल घेतली जाणार आहे. संबंधितांनी आपली तक्रार तारीख व ज्या अधिकाऱ्यास मूळ तक्रार पाठविली असेल त्याचे नाव व हुद्दा याचा सपष्ट उल्लेख करून मूळ अर्जाच्या प्रतीसह दि. ९ मार्च २०२४ रोजी पर्यंत पोहोचेल अशा रीतीने सचिव डाक अदलात, मुख्य पोस्ट जनरल यांचे कार्यालय मुंबई अनेक्स, जीपीओ इमारत, चौथा माळा, मुंबई-४००००१ यांच्या पत्त्यावर पाठवावी, असे प्रवर डाक अधीक्षक सांगली यांनी कळविले आहे.

## 'श्री शंकर' च्या चेअरमनपदी रणजितसिंह मोहिते-पाटील

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

माळशिरस/प्रतिनिधी : श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगरच्या नूतन संचालक मंडळ निवडणूक नुकतीच पार पडली. यामध्ये मोहिते-पाटील गटाचे वर्चस्व राखत पुन्हा विजय मिळवला. निवडणुकीनंतर कारखाना कार्यस्थळी चेअरमन पदी आम. रणजितसिंह मोहिते पाटील यांची तर व्हा. चेअरमन पदी ड. मिलिंद कुलकर्णी यांची बिनविरोध निवड झाली.

महाराष्ट्र राज्याचे माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील व सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली प्रगतीपथावर असलेला श्री शंकर सहकारी साखर कारखाना लि. सदाशिवनगर ची नूतन संचालक मंडळ निवडणूक नुकतीच पार पडली. यामध्ये मोहिते-पाटील गटाचे वर्चस्व राखत पुन्हा विजय मिळवला.

यावेळी माजी जि. प. उपाध्यक्ष बाबाराजे देशमुख,


**माळशिरस : निवडीनंतर नूतन चेअरमन व व्हा. चेअरमन यांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर**

पंचायत समितीचे माजी उपसभापती अर्जुनसिंह मोहिते पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती मामासाहेब पांढरे, कारखान्याचे सर्व नूतन संचालक सुरेश बापुराव पाटील, महादेव सुखदेव शिंदे, दत्तात्रय शंकरराव रणनवरे, बाळासो साहेबराव माने, कुमार बबन पाटील, सुधाकर लक्ष्मणराव पोळ, मालोजीराव शहाजीराव देशमुख, प्रफुल्ल रंगनाथ कुलकर्णी, शिवाजी रामहरी गोरे, सदाशिव धोंडीबा वाघमोडे पाटील, रणजीत ज्ञानेश्वर पाटील, बलभिम अंकुश पाटील, दत्तात्रय चांगदेव मिसाळ, सचिन औदुंबर लोकरे, अर्जुन भिमा धाईजे, सौ. लिलावती सोपान देवकर, सौ. लिलावती नामदेव खराडे, रामदास गोविंद कर्णे, सुनिल आप्पासो माने माजी संचालक नंदन दाते, दत्ता चव्हाण, रमेश जगताप, सुरेश मोहिते, धोंडीराम नाळे, शिवामृत संचालक अरविंद भोसले, प्रताप सालगुडे, सरपंच विरकुमार दोशी, उप सरपंच देवीदास ढोपे, सरपंच शिवाजी जाधव, शिवराज निंबाळकर, उदय धाईजे, दादा पालवे, हुसेन मुलाणी, दादा पाटील, पराग भोरे, रामदास काळे, अस्लम मुजावर, समाधान भोसले, देशमुख युवराज, रणजित फडतरे तसेच तालुक्यातील व जिल्ह्यातील शेतकरी सभासद व कार्यकर्ते उपस्थित होते.

## * संपादकीय *

# प्रकल्पांना गती देणारा खासदार हवा

शालेय पाठ्यपुस्तकांमध्ये नागरिकशास्त्राचा अभ्यास करताना लोकसभा, विधानसभा आणि महापालिका यांचे अधिकार आणि कर्तव्ये बहुतेक सर्व जण शिकलेले असतात. या प्रतिनिधी मंडळांमध्ये काम करणारे खासदार, आमदार आणि नगरसेवक यांच्याकडून कोणती कामे अपेक्षित असतात, हे सुद्धा आपल्याला माहिती असते. दुर्दैवाने, निवडणुकीच्या रणधुमाळीत खासदाराकडून स्थानिक स्तरावरील नगरसेवकांकडून केली जाणारी कामे आणि नगरसेवकांकडून खासदाराच्या अखत्यारित येणाऱ्या कामांची जाहिरातबाजी राजकीय पक्षांकडून केली जाते. मतदार म्हणून आपण त्यावर विश्वास ठेवतो आणि खरे तर फसतोच. खासदाराच्या विकास निधीतून आपल्या परिसरातील एखाद्या व्यायामशाळेचे (ओपन जिम) उद्घाटन, एखाद्या वाचनालयाचे नूतनीकरण, रस्त्यावर सार्वजनिक स्वच्छतागृहांचे बांधकाम अथवा बसथांबे बांधून दिले, की 'खासदार खरेच कामाचा आहे,' अशी भावना होत असेल, तर नागरिकशास्त्राचे पुस्तक पुन्हा अभ्यासायला हवे.

कायदेमंडळ म्हणून देशासाठी एखादे धोरण निश्चित करण्यात खासदाराचा सहभाग असतोच. तो सत्ताधारी पक्षाऐवजी विरोधी पक्षात असला, तरी उपयुक्त सूचना करणे खासदाराच्या हाती असतेच. त्याचवेळी केंद्र सरकारकडून जाहीर केल्या जाणाऱ्या विविध योजनांमधून आपल्या मतदारसंघातील विकासकामांना गती देणे अथवा मतदारसंघातील केंद्रीय स्तरावरच्या प्रलंबित कामांसाठी संबंधित मंत्री किंवा मंत्रालयाच्या कामातून निधी मिळविणे, यासाठी दिल्लीत पाठपुरावा केला जाणे अपेक्षित आहे. एखाद्या योजनेसाठी राज्य सरकारची मदत लागते. अशावेळी संबंधित खासदाराने राज्य सरकारच्या माध्यमातून संबंधित योजना अथवा त्याद्वारे उपलब्ध होणारा निधी लवकर प्राप्त व्हावा, याची जबाबदारी घ्यायला हवी. देशभराच्या विविध भागांतील खासदार त्यासाठी प्रयत्न करताना दिसतात. पहिल्यांदाच निवडून जाणाऱ्या एखाद्या खासदाराला कदाचित पहिल्या दोन-तीन वर्षांत विविध योजनांसाठी निधी मिळविण्यात अथवा मंत्री-मंत्रालयातील अधिकारी यांच्याशी थेट संपर्क नसल्याने पाठपुरावा करण्यात अडचणी निश्चित येऊ शकतात. मात्र, त्याचसाठी संसद अधिवेशनाच्या कालावधीशिवाय दिल्लीत तळ ठोकून राहणे, पक्षाच्या माध्यमातून अथवा काही वरिष्ठ सहकाऱ्यांचे मार्गदर्शन घेऊन मतदारसंघातील योजनांच्या प्रगतीचा आढावा घेणे, काही अडचणी असल्यास त्या सोडविणे; अन्यथा थेट संसदेमध्येच प्रश्नोत्तरे, चर्चा या माध्यमातून आवाज उठविणे, अशा विविध माध्यमांतून मतदारसंघातील विकासकामांना गती देता येऊ शकते. या पद्धतीने काम करणाऱ्या खासदारांची संख्या काही कमी नाही. त्यासाठी फक्त राजकीय इच्छाशक्तीची गरज आहे.

न. वि. गाडगीळ, इंदिरा मायदेव, ना. ग. गोरे, शंकरराव मोरे, एस. एम. जोशी, मोहन धारिया, विठ्ठलराव गाडगीळ या सर्वांनी स्वातंत्र्यानंतर सुरुवातीच्या ३५-४० वर्षांमध्ये पुण्याचे प्रतिनिधीत्त्व संसदेत केले आहे. खासदार म्हणून ओळख होण्याआधीच यातील बहुतांश नावांचा देशभरात दबदबा होता. यातील काहींनी केंद्रीय मंत्रिमंडळासह इतर महत्त्वाच्या घटनात्मक जबाबदाऱ्या सांभाळल्या. त्यानंतरच्या काळात सुरेश कलमाडी हे नावही दिल्लीतील बहुतेकांच्या परिचयाचे होते. केंद्रीय मंत्री आणि ऑलिम्पिक असोसिएशनच्या माध्यमातून दिल्लीतील वरिष्ठ पातळीवरच्या नेत्यांशी कलमाडी यांचे चांगले संबंध असल्याचा फायदा पुण्याला निश्चित झाला आहे, यात शंकाच नाही. अण्णा जोशी, विठ्ठल तुपे, प्रदीप रावत, अनिल शिरोळे आणि दिवंगत खासदार गिरीश बापट यांनी त्यांच्या काळात पुण्यासाठी विविध योजनांद्वारे निधी मिळविण्यासाठी पुढाकार घेतला आहे. त्यापैकी अण्णा जोशी आणि विठ्ठल तुपे हे विरोधी पक्षाचे खासदार असल्याने त्यांना सत्ताधारी पक्षाच्या खासदारांच्या तुलनेत विविध योजना किंवा प्रकल्पांसाठी पुढाकार घेण्यात मर्यादा होत्या.

राष्ट्रकुल युवा क्रीडा स्पर्धांच्या आयोजनाची संधी पुण्याला मिळाल्याने केंद्र सरकारच्या निधीतून पुण्यात रस्त्यांची खूप कामे २००७च्या दरम्यान झाली. त्यानंतरच्या गेल्या १५ वर्षांमध्ये पुणे मेट्रो प्रकल्प आणि लोहगाव येथील टर्मिनलचे विस्तारीकरण या दोन प्रकल्पांचा अपवाद वगळता पुण्यामध्ये केंद्राच्या योजनेतून भरीव कामे झाल्याचे दिसून येत नाही. मुळा-मुळा नदी शुद्धिकरण प्रकल्पासाठी केंद्र सरकारने अनुदान दिले असले, तरी दोन खासदारांच्या पूर्ण टर्म संपूनही हे काम अजूनही पूर्णत्त्वास गेलेले नाही. देशात सर्वाधिक गाजावाजा झालेल्या 'स्मार्ट सिटी' योजनेत पुणे दुसऱ्या क्रमांकावर होते. त्यात ठरविलेली किती कामे पूर्ण झाली, याचा आढावा खासदारांनी घ्यायचा नाही तर कोणी? केंद्रीय स्तरावर अडकलेले पुण्याशी संबंधित इतरही महत्त्वाचे प्रकल्प आणि योजनांना अपेक्षित गती मिळालेली नाही.

खासदार म्हणून विविध राजकीय पक्षांकडून पुढील महिन्यात उमेदवारांची घोषणा होईल. त्यांचा प्रचार सुरू होईल. या प्रचारादरम्यान त्यांच्या पुण्याच्या जाहीरनाम्यात दिल्लीतील कोणत्या प्रकल्पांचा समावेश आहे, हे जरूर तपासा. पुण्याचा खासदार होऊ इच्छिणाऱ्या उमेदवाराचा पाच वर्षांचा प्राधान्यक्रम काय असेल? हे विचारण्याचे धाडस पुणेकरांनी दाखवायला हवे आहे. महापालिका आणि राज्य सरकारकडून होणाऱ्या कामांचे आश्वासन तुमचा खासदारकीसाठी उभा राहणारा उमेदवार देणार असेल, तर त्यालाही तुम्ही नागरिकशास्त्राचे पुस्तक भेट देत, त्याच्या कर्तव्यांची जाणीव करून देऊ शकता. पुणे आणि परिसरातील वाढते नागरीकरण, वाढती लोकसंख्या, उद्योग-सेवा व्यवसायांचे निर्माण होणारे जाळे, या परिसरातून केंद्र सरकारच्या तिजोरीत जमा होणार महसूल आणि त्या तुलनेत पुण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनांसाठी मिळणारा निधी, याचा ताळमेळ साधला जायला हवा. उदाहरणार्थ, पुण्यातून १०० रुपयांचा कर सरकारी तिजोरीत जमा होत असेल, तर अगदी पूर्ण १०० रुपयांची नाही; पण किमान ५० रुपयांची कामे तरी पुणे आणि परिसरात होतात का? यावर पुणेकर मतदारांनी लक्ष ठेवण्याची गरज आहे. राजकीय पक्ष कोणताही असो; पण २० लाख लोकांचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या खासदाराने मतदारांप्रती उत्तरदायी असलेच पाहिजे.

नागरिकांमधून निवडून जाणाऱ्या लोकसभेच्या खासदारांप्रमाणे एखाद्या शहराचे, परिसराचे प्रतिनिधीत्त्व करणाऱ्या राज्यसभेच्या खासदारांकडून स्थानिक विकास कामे आणि प्रकल्पांच्या पूर्ततेसाठी पाठपुरावा-प्राधान्य दिले गेले पाहिजे. राज्यसभेवर पुण्यातील दोन खासदारांनी सलग १२ वर्षे प्रतिनिधीत्त्व केले आहे आणि आता मेधा कुलकर्णी यांच्या निवडीमुळे लोकसभेतील जिल्ह्याच्या चार खासदारांसह पुण्याचा आणखी एक खासदार संसदेत पुण्याचे प्रश्न-समस्या मांडू शकणार आहे. पुणे शहर, पिंपरी-चिंचवड, पुणे महानगर आणि पुणे जिल्हा अशा क्रमाने मांडणी केल्यास जवळपास एक ते सव्वा कोटी जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या सर्वच खासदारांनी एकत्रितपणे शहराच्या विकासाकरिता योगदान देणे महत्त्वाचे ठरणार आहे. देशाच्या अनेक भागांत अनेक प्रकल्प गतीने पुढे सरकत असताना पुणे परिसरात अनेक प्रकल्पांना अचानक 'स्पीडब्रेकर' लागतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी 'विकसित भारता'कडे वाटचाल करण्याचे स्वप्न सातत्याने दाखवत असताना, त्यात पुणे परिसर विविध प्रश्न-समस्यांच्या जंजाळात अविकसित राहून कसे चालेल? त्यासाठी, सर्वंकष विचार करून दूरदृष्टीने पुण्याच्या विविध प्रकल्पांना केंद्रीय स्तरावरून चालना देण्याचे काम करणारा खासदार हीच पुण्याची आजची गरज आहे.

# 'ईडी'ची अत्यल्प दोषसिद्धी

सक्तवसुली संचालनालय म्हणजे ईडी देशभरात कारवाया करीत असले तरी या सगळ्या छापे, खटले यांचा तार्किक शेवट आरोपींच्या शिक्षेत होण्याचे प्रमाण जेमतेम अर्धा टक्का आहे. छापे आणि प्रत्यक्ष शिक्षा यांच्यात इतकी तफावत का?

सत्तर हजार कोटी रुपयांच्या जमीन व खाण घोटाळ्यात झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन सध्या तुरुंगात आहेत; तर तमिळनाडू-मदुराईतील ईडीचे अधिकारी अंकित तिवारी यांना वीस लाख रुपयांची लाच घेताना अटक झाली. याउलट वाळू उत्खनन घोटाळ्यातील कारवाईला तमिळनाडू सरकारने आव्हान दिल्यावर सर्वोच्च न्यायालयाने तुम्हाला हा अधिकार कोणी दिला, असे म्हणत फटकारले.

सध्या प. बंगालपासून महाराष्ट्रापर्यंत अनेक प्रकरणांमध्ये ईडीच्या कारवाया सुरू आहेत. शिवसेनेचे प्रवक्ते संजय राऊत यांना पत्राचाळ घोटाळाप्रकरणी अटक झाली. तसेच प. बंगालमधील संदेशखाली प्रकरणातील मुख्य आरोपी शेख शहाजहाँ तसेच माजी मंत्री पार्थ चॅटर्जी यांच्यावर पेपरफुटी प्रकरणी कारवाई सुरू आहे. सोनिया व राहुल गांधी यांनाही नॅशनल हेरल्ड प्रकरणात तसेच उद्योगपती निरंजन हिरानंदानी यांना ईडीच्या चौकशीला सामोरे जावे लागत आहे.

अलीकडे 'प्रिव्हेंशन ऑफ मनी लाँड्रिंग' कायद्यांतर्गत अटकेसाठी ईडीचे अधिकार सर्वोच्च न्यायालयाने कायम ठेवले आहेत. या तरतुदींना घटनात्मक आव्हान देणाऱ्या याचिका न्या. ए. एम. खानविलकर यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने फेटाळल्या. या कायद्याचा वापर ईडीकडून विशेषत: काळ्या पैशाच्या विरोधातील कारवाईसाठी केला जातो. कार्ती चिदंबरम, माजी गृहमंत्री अनिल देशमुख, मेहबूबा मुफ्ती यांच्यासह २४२ याचिकाकर्त्यांनी या कायद्यांतर्गत ईडीने केलेली अटक जप्ती आणि तपास प्रक्रिया यांना सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. याचिकाकर्त्यांनी कायद्याच्या जवळपास सर्वच तरतुदींच्या घटनात्मक वैधतेविषयी आव्हान दिले होते. परंतु न्यायालयाने आर्थिक गैरव्यवहार रोखण्यासाठी कायद्याच्या वैधतेवर शिक्कामोर्तब केले आणि हस्तक्षेपास नकार दिला. न्यायालयाने स्पष्टपणे सांगितले की, ईडीचे अधिकारी पोलिस नाहीत. यामुळे, आरोपीचा जबाब नोंदविल्यामुळे घटनेचे उल्लंघन होत नाही. आरोपी आपल्याविरुद्ध पुरावा द्यायला बांधील नाहीत, हा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला. आरोपीच्या जामीन अर्जाचा विचार करताना सरकारी वकिलांचा युक्तिवाद ऐकून घेण्याबरोबरच आरोपी यापुढे अधिक गुन्हा करणार नाहीत, ही अट अनिवार्य राहते. थोडक्यात, ईडीच्या खटल्यात जामीन मिळणे कठीण होऊन जाते.

ईडी ही केंद्रीय अर्थ खात्याच्या महसूल विभागाअंतर्गत असलेली संस्था आहे. भारतीय महसूल सेवा, भारतीय पोलिस सेवा आणि भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी ईडीमध्ये कार्यरत आहेत. स्वातंत्र्यानंतर परकीय चलन नियमन कायदा लागू करण्यात आला



होता. सन १९५६ मध्ये ईडीची स्थापना करण्यात आली. व्हिएन्ना परिषदेत ठरल्याप्रमाणे 'प्रिव्हेन्शन ऑफ मनी लाँड्रिंग' कायदा लागू झाल्यानंतर त्याची अंमलबजावणी देशात ईडीकडून केली जातो. कायदा मालमत्तांवर कारवाई करण्यासाठी भारतात एक जुलै २००५ रोजी नवा कायदा अमलात आला.

सर्वोच्च व उच्च न्यायालय किंवा केंद्र सरकारच्या आदेशानंनुसार 'सीबीआय' तपास करते. राज्याच्या अखत्यारीतील गुन्ह्यांसंबंधी राज्य सरकारची परवानगी लागते. परंतु ईडीबाबत तसे नाही. एक कोटी किंवा त्याहून अधिक रकमेच्या गैरव्यवहाराचा गुन्हा पोलीस ठाण्यात नोंदविला गेल्यानंतर पोलिस त्याची माहिती ईडीला देतात. ईडी पोलीस ठाण्यातून एफआयआर किंवा चार्जशिटची प्रत घेऊन तपास करू शकते. अर्थात, याशिवायही स्वतंत्रपणे तपास करण्याचा अधिकार ईडीला आहेच.

ईडी 'एफईएमए'चे उल्लंघन, हवाला व्यवहार, परकीय चलन नियमांचे उल्लंघन, परदेशातील कोणत्याही मालमत्तेवर कारवाई आणि परदेशातील मालमत्ता खरेदी प्रकरणांची चौकशी करते. ईडीला मनी लाँड्रिंगच्या आरोपीविरुद्ध जप्तीचे आणि अटकेचे अधिकार आहेत. ईडी चौकशी न करता मालमत्ता जप्त करू शकते. यावरूनही ईडीच्या अधिकारांची व्याप्ती लक्षात येते. अटकेच्यावेळी ईडीला कारणे सांगण्याचे बंधन नाही. अर्थात, कायदा म्हणजे मनमानी नाही, हे न्यायालयाचे निरीक्षण याचिकाकर्त्यांना पटले नाही.

फेमा आणि पीएमएलए या कायद्यांन्वये प्रकरणातील आरोपींना जामीन देताना ईडी विरोध करू शकते. फरारी व्यक्तीच्या प्रत्यार्पणातील अडचणी लक्षात घेऊन ईडीला त्याची संपूर्ण मालमत्ता जप्त करण्याचा अधिकार आहे. निर्यात-आयातीमधील आर्थिक फसवणुकीची प्रकरणे ईडी हाताळते किंवा परदेशी चलनाच्या अवैध व्यापाराचीही चौकशी ईडी करते. बेकायदा कमावलेल्या पैशांचे लाँड्रिंग करून ते कायदेशीर करण्याच्या प्रयत्नास 'मनी लाँड्रिंग' म्हणतात. आरोपीने पैसे कसे वळविले, याचा शोध ईडी घेते. मनी लाँड्रिंगसाठी सात ते दहा वर्षांपर्यंत कारावास आणि दंडाची तरतूद आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाने कायद्यासंदर्भात स्पष्टता आली आणि वैधता अधोरेखित झाली आहे. परंतु कायदा पूर्वीही अस्तित्वात होताच; तरी ईडीच्या गुन्ह्यांतील शिक्षेचे अत्यल्प प्रमाण हे चिंतनीय आहे. ईडीने जप्त केलेली एक लाख १५ हजार ३५० कोटी रुपयांची रक्कम देशाच्या तिजोरीत जमा झाली. याचे स्वागत करायला हवे. मात्र, गेल्या १७ वर्षात ५९०६ गुन्ह्यांमध्ये केवळ चारशे जणांना अटक झाली व २३ गुन्ह्यांमध्ये शिक्षा झाली. त्यापैकी केवळ १७६ खटले आमदार व खासदार यांच्या विरोधात होते. या तुलनेत सीबीआयने दाखल केलेल्या गुन्ह्यांमध्ये शिक्षेचे प्रमाण ६५ ते ७० टक्के आहे. याउलट लोकसभेतील लेखी उत्तराप्रमाणे ईडीच्या गुन्ह्यात मात्र शिक्षेचे प्रमाण जेमतेम ०.५ इतके खाली का येते, हा प्रश्न अनुत्तरित राहतो. देशातील प्रलंबित खटले वेगाने निकाली निघण्यासाठी न्यायाधिशांची संख्या वाढविली पाहिजे, हे खरे आहे. ईडीने दाखल केलेले खटले तार्किक शेवटापर्यंत जात नाहीत. बहुतेक आरोपी अतिश्रीमंत असतात. त्यांचे वकील क्लृप्त्या वापरतात. कायद्याचे पावित्र्य, स्वातंत्र्य आणि नि:पक्षपातीपणा यावर सारे यश अवलंबून असते. भाजपमध्ये आल्यावर नेत्यांवरच्या कारवाया थंड का होतात, असा प्रश्न विरोधक विचारतात. शेवटी 'कायद्यात शब्दापेक्षा हेतू महत्त्वाचा' हे इंग्लंडचे चीफ जस्टीस लॉर्ड हेवर्ट यांनी पूर्वीच सांगून ठेवले आहे. न्याय केवळ होऊन चालत नाही. तो झाला असे समाजातील सर्व घटकांना वाटेल, त्या दिवसापासून लोकशाही अधिक बळकट होईल.

# भिलवडी शिक्षण संस्थेचा मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानात पलूस तालुक्यात प्रथम क्रमांक

## संस्थेला मिळणार ३ लाख रुपये बक्षीस

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भिलवडी : शिक्षक, पालक, विद्यार्थी व माजी विद्यार्थी यांच्यात शाळेप्रती उत्तरदायित्वाची भावना निर्माण व्हावी यासाठी महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा हा उपक्रम राज्यात प्रथमच राबविण्यात आला. पलूस तालुक्यातील भिलवडी शिक्षण संस्थेचे सेकंडरी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज भिलवडी विद्यालयाने या अभियानात पलूस तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला असून ३ लाखाच्या बक्षिसास शाळा पात्र झालेलीआहे.

या यशाबद्दल संस्थेच अध्यक्ष मा. श्री.विश्वासजी चितळे , उपाध्यक्ष डॉ. बाळासाहेब चोपडे , सचिव मानसिंग हाके , सर्व संचालक, मुख्याध्यापक एस. एस. मोरे, उपमुख्याध्यापक विजय तेली, पर्यवेक्षक विनोद सावंत यांनी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी विद्यार्थिनी, ग्रामस्थ, पालक यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले.

या उपक्रमासाठी गटशिक्षणाधिकारी मा.अनिस नायकवडी सर्व विषय तज्ञ शिक्षण विभाग पंचायत समिती पलूस यांचे बहुमोलाचे मार्गदर्शन लाभले. मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या स्पर्धेचे सर्व निकष शाळेने पुर्ण केले असून शाळेचे सुशोभीकरण, रंगरंगोटी, प्रबोधनात्मक विचार, सुविचार बोलक्या भिंती, विद्यार्थ्यांची बचत बँक, परसबाग, अमृतवाटिका नवभारत साक्षरता, मेरी माटी मेरा देश अभियान, पोषण आहार , महावाचन चळवळ, १०० टक्के उपस्थितीसाठी शाळेने राबवलेले उपक्रम, वक्तृत्व, हस्ताक्षर, निबंध, पोस्टर ,चित्रकला यामध्ये आयोजित केलेल्या स्पर्धा, स्वच्छता मॉनिटर, विद्यार्थ्यांनी बनवलेले व्हिडिओ, वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन, शासकीय क्रीडा स्पर्धेत मिळवलेले यश, प्लॅस्टिक मुक्त शाळा, ख ड ज ९००१:२०१५ मनांकित शाळा ,तंबाखू मुक्त शाळा, तसेच दहावीचा व बारावी उत्कृष्ट टक्केवारीच्या निकालाची परंपरा, नवोदय, स्कॉलरशिप, एन एम एम एस परीक्षेत मिळालेले भरीव यश,विद्यार्थ्यांना केलेले मार्गदर्शन, राबवलेले अभिनव उपक्रम, सुसज्ज ग्रंथालय, विज्ञान प्रयोगशाळा, संगणक प्रयोगशाळा, गणित प्रयोगशाळा, ६ डिजिटल क्लास रूम या सर्व बाबींचा विचार करण्यात आला.

मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानात शाळेने तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावल्याबद्दल शाळेचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. लवकरच जिल्हा परिषद सांगली येथे पालकमंत्री, खासदार, आमदार सर्व शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत दिमाखदार सत्कार सोहळा संपन्न होणार आहे अशी माहिती शाळेचे मुख्याध्यापक एस. एस. मोरे यांनी दिली आहे.

# 'टास्क'च्या आमिषाने सॉफ्टवेअर इंजिनियर महिलेसह चौघांना १ कोटींचा गंडा

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: दिलेले टास्क पूर्ण केल्याचा चांगला परतावा मिळेल तसे गुंतवणूक केल्यास चांगला नफा मिळेल, असे आमिष दाखवून महिलेसह चौघांची १ कोटींची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी बुधवारी (दि. ०६) वेगवेगळ्या पोलीस ठाण्यांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पहिल्या घटनमध्ये वारजे परिसरात राहणाऱ्या ४३ वर्षीय सॉफ्टवेअर इंजिनियर महिलेला चॅनेल सबस्क्राईब केल्यास चांगला नफा मिळेल असे आमिष दाखवून ४७ लाख ७३ हजार रुपये भरण्यास भाग पाडले. मात्र परतावा न देता फसवणूक केली आहे. दुसऱ्या घटनेमध्ये कोथरूड परिसरात राहणाऱ्या ३७ वर्षीय युवकाला वेगवेगळे टास्क देऊन ते पूर्ण केल्यास चांगला नफा असे सांगून गुंतवणूक करण्यास भाग पाडले. वेगवगेळी कारणे सांगून त्यांच्याकडून एकूण ३९ लाख ५३ हजार रुपये भरण्यास सांगितले. तिसऱ्या घटनेत, वानवडी परिसरात राहणाऱ्या २३ वर्षीय तरुणाला हॉटेल रेटिंगचा टास्क देऊन ९ लाख ४७ हजार रुपये भरण्यास भाग पाडून फसवणूक केली आहे. चौथ्या घटनेमध्ये, वडगाव शेरी परिसरात राहणाऱ्या ३५ वर्षीय युवकाला पार्ट टाइम जॉबचे आमिष दाखवून ६ लाख ७४ हजार रुपये भरण्यास फसवणूक केली आहे.

# 'जीएसटी' कार्यालयातील राज्यकर महिला अधिकारी अटकेत; ३ हजारांची लाच घेताना रंगेहाथ पकडले

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे: वस्तू आणि सेवा कार्यालयातील (जीएसटी) राज्यकर अधिकारी महिलेस तीन हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले. याप्रकरणी येरवडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

मालती रमेश कठाळे (वय ४३) असे गुन्हा दाखल केलेल्या राज्यकर अधिकाऱ्याचे नाव आहे. याबाबत एका व्यावसायिकाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे (एसीबी) तक्रार दिली होती. तक्रारीची पडताळणी करण्यात




आल्यानंतर बुधवारी सायंकाळी वस्तू आणि सेवा कर कार्यालयात सापळा लावून कारवाई करण्यात आली. तक्रारदाराने पत्नीच्या नावाने जीएसटी क्रमांक मिळवण्यासाठी ऑनलाइन अर्ज सादर केला होता. अर्ज राज्यकर अधिकारी मालती कठाळे यांच्याकडे प्रलंबित होता. त्यानंतर कठाळे यांनी तक्रारदार व्यावसायिकाशी संपर्क साधून त्याला जीएसटी कार्यालयात बोलावून घेतले. जीएसटी क्रमांक देण्यासाठी तीन हजार रुपयांची लाच मागितली. तक्रारीची पडताळणी करण्यात आली. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पथकाने सापळा लावून कठाळे यांना तीन हजार रुपयांची लाच स्वीकारताना पकडले. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अतिरिक्त अधीक्षक डॉ. शीतल जानवे यांच्या मार्गदर्शनाखाली उपअधीक्षक नितीन जाधव आणि पथकाने ही कारवाई केली. पोलीस निरीक्षक प्रसाद लोणारे तपास करत आहेत.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे मिरजेत थेट प्रक्षेपण

## जिल्हा शक्ती वंदन कार्यक्रमा अंतर्गत उपक्रम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

मिरज : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भाषणाचे मिरजेत थेट प्रक्षेपण एलईडीच्या साह्याने दाखवण्यात आले. जिल्हा शक्ती वंदन कार्यक्रमा अंतर्गत उपक्रम राबवण्यात आला. मिरज ब्राह्मणपुरीतील रुंगठा उद्याणा जवळ या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिलांची सुरक्षितता, महिलांसाठीच्या योजना या बाबत माहिती दिली.तसेच महिलांवर अत्याचारांचे प्रमाण वाढले असून त्यासाठी अत्याचार करणाऱ्याला फाशीची शिक्षा देण्यात यावी अश्या आश्यायचे विचार आपल्या भाषणात मांडले.

सौ. सुमनताई सुरेश भाऊ खाडे यावेळी उपस्थित होत्या. मिरज शहर पूर्वमंडल अध्यक्ष अनघा कुलकर्णी, माजी नगरसेविकास सभापती अस्मितताई सलगर, जिल्हा उपाध्यक्ष प्राची ताई फाटक, जिल्हाचिटणीस अनुराधा जोशी, उज्वला चौगुले, नम्रता साठे, अमृता पांढरे, वैशाली पांढरे, लतिका पाटील, सुप्रिया जोशी, शीला जुगल, भारती



बेंद्रे, नूतन कोपर्डे, दीपा कुलकर्णी, सीमा मगदूम, रेखा कुलकर्णी, संध्या कुलकर्णी, वैशाली वाणी, उज्वला सातपुते आधी सर्व परिसरातील महिला उपस्थित होत्या.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायक्षेत्र)

# पलूस-कडेगाव मतदार संघातील एकही गाव एकरभरही क्षारपड ठेवणार नाही : आ.डॉ.विश्वजीत कदम

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

भिलवडी : स्व.डॉ.पतंगराव कदम यांच्यापासून कदम कुटुंबियाला जनतेने आजपर्यंत साथ दिली आहे. यामुळे विविध विकासकामे, मदत या माध्यमातून पलूस-कडेगांव मतदारसंघातील जनतेला प्रेमाचे व्याज लागते. एकही गाव एकरभरही क्षारपड ठेवणार नाही. डॉ.पतंगराव कदम सोनहिरा साखर कारखान्याच्यावतीने क्षारपडमुक्त होण्यासाठी प्रयत्न करणार आहे. असे प्रतिपादन आ.डॉ.विश्वजीत कदम यांनी केले.

येथील भुसंजीवनी व भुमाता बहुउद्देशीय शेतकरी सहकारी संस्था, भिलवडी-चोपडेवाडी संचलित सच्छिद्र निचरा प्रणाली या प्रकल्पाच्या मुख्य पाईप लाईनचा उद्घाटन समारंभ डॉ. कदम यांच्याहस्ते पार पडला. यावेळी ते बोलत होते. पलूस तालुक्याचे नेते महेंद्र लाड, माजी जि.प.सदस्य, प्रमुख नेते संग्राम पाटील, उद्योजक मकरंद चितळे, सरपंच विद्याताई पाटील, उपसरपंच पृथ्वीराज पाटील, चंद्रकांत पाटील, उपस्थित होते.




सांगली जिल्ह्यातील ही पहिलीच १०० टक्के यशस्वी योजना ठरली आहे. या योजनेत १५५ शेतकऱ्यांच्या २९० एकर जमिनीतील क्षारयुक्त पाण्याचा ९ किलोमीटर लांबीच्या पाईपतून निचरा सुरु झाला आहे. सर्व शेतकऱ्यांनी मिळून सुमारे ८० लाखांच्या आसपास तर डॉ.विश्वजीत कदम यांनी ८८ लाख रुपये या योजनेला दिले आहेत.

डॉ.कदम म्हणाले, येथील शेतकऱ्यांची तळमळ पाहून माझ्यातही एक उर्मी आली. माझ्या जनतेला २ कोटींची मदत करायला लागले तरी चालेल पण ही योजना यशस्वी करून दाखवायची हा इरादा पक्का होता. स्व. डॉ. पतंगराव कदम यांनी दिलेली शिकवण आहे. कुठलाही शेतकरी त्याच्या कामासाठी आला तर तो कारखान्याच्या पायरीवरून रिकाम्या हाताने गेला नाही पाहिजे. आणि तोच वारसा मी आज नेटाने चालवत आहे. तुमची तळमळ, धावपळ पाहून मीपण तुम्हाला वेळच्या वेळी मदत करत गेलो आहे. मतदारसंघातील प्रत्येक गावात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे. तुमच्या आशिर्वादाने आणि पाठिंब्याने मी महाराष्ट्राचे राजकारण करेन. कुणालाही कसलीच कमी पडू देणार नाही.

डॉ.विश्वजीत कदम म्हणाले, लोकशाही टिकवण्यासाठी मी ताठ मानेने, स्वाभिमानाने राजकारण करेन. आताचे राजकारण बघितले तर एका वेगळ्या वळणावर गेले आहे. विरोधी पक्ष चुकीच्या बातम्या पेरत आहे. विरोधकांच्या अफवांवर विश्वास ठेवू नका. लोकसभा जवळ आल्याने वावड्या उठत असतात. महेंद्र लाड व शेतकऱ्यांनी मनोगत व्यक्त केले. भिलवडी, चोपडेवाडी येथील शेतकरी, नेते, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सांगली बहु चांगली, कृष्णामृत पुस्तकांचे प्रकाशन

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई यांच्या हस्ते आज सांगली बहु चांगली या कॉफी टेबल बुक व सांगलीची विविध क्षेत्रातील महती व प्रगती सांगणाऱ्या कृष्णामृत या दोन पुस्तकांचे प्रकाशन करण्यात आले.

इस्लामपूर येथे झालेल्या शासन आपल्या दारी या कार्यक्रमात हे पुस्तक प्रकाशन करण्यात आले. यावेळी पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, राज्य उत्पादन शुल्क मंत्री शंभूराज देसाई, विधानपरिषदेच्या उपसभापती निलम गोऱ्हे, खासदार धैर्यशील माने, आमदार सुधीर गाडगीळ, माजी मंत्री अण्णा डांगे, माजी राज्यमंत्री सदाभाऊ खोत, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधीक्षक संदीप घुगे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सुनिल पवार आदी उपस्थित होते.

यावेळी या पुस्तकाच्या संपादनासाठी सहाय्य केलेले मंडळ जेष्ठ विधिज्ञ बाबासाहेब मुळीक, जेष्ठ पत्रकार चिंतामणी सहस्रबुद्धे, अशोक घोरपडे, इतिहास संशोधक मानसिंगराव कुमठेकर, तत्कालीन जिल्हा माहिती अधिकारी संप्रदा बीडकर व विद्यमान जिल्हा माहिती अधिकारी फारुख बागवान यांचा पुष्प देवून सत्कार करण्यात आला.

सांगली बहु चांगली या कॉफी टेबल बुकमध्ये सांगली जिल्ह्याच्या स्वातंत्र्यचळवळ, शिक्षण, शेती, उद्योग, सहकार आदि विविध क्षेत्रातील इतिहास व प्रगतीचा चित्रमय आढावा आकर्षक पद्धतीने घेण्यात आला आहे. तसेच कृष्णामृत या पुस्तकात सांगली जिल्ह्याची स्वातंत्र्य चळवळ, राजकीय, शिक्षण, कृषि, क्रीडा, सांस्कृतिक, साहित्यिक, खाद्य क्षेत्रातील परंपरा विविध तज्ज्ञांच्या लेखणीतून कागदावर उतरली आहे. या माध्यमातून जिल्ह्याचा विविध क्षेत्रातील देदीप्यमान, वैभवशाली व अभिमानास्पद वारसा व प्रगती दस्तावेजबद्ध करण्याचा प्रयत्न जिल्हा प्रशासन, जिल्हा माहिती कार्यालय व संपादकीय मंडळाच्या वतीने करण्यात आला आहे. तत्पूर्वी या पुस्तकाची मांडणी, सजावट तसेच आशय घनता बघून मुख्यमंत्र्यांनी जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली व पुस्तक दर्जेदार झाल्याचे सांगितले. यावेळी प्रशासनातील इतर अधिकारी उपस्थित होते.

# मागासवर्गीय, विधवा, परितक्त्या व भूमिहीन महिलांना विनाअट शिधा द्या

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कुरुंदवाड : केंद्र सरकार अनेक योजनेत फक्त पोकळ गॅरंटी देत असून प्रत्यक्षात याचा फटका मागासवर्गीय महिला,विधवा ,परितक्त्या व भूमिहीन महिलांना बसत असून रेशन वरील शिधा मिळण्यासाठी ग्रामीण भागासाठी ४४०००/- (चव्वेचाळीस हजाराच्या) उत्पन्नाची अट घातल्यामुळे व गाव पातळीवर तलाठी सदर उत्पन्नाच्या दाखल्यासाठी वेठीस धरत असल्यामुळे अनेक मागासवर्गीयपरितक्त्या, विधवा व भूमिहीन महिला कुटुंब प्रमुखांना याचा लाभ मिळत नसल्यामुळे सदर महिला प्रमुख असलेल्या कुटुंबांना शिधापत्रिकेवरील शिधा मिळण्यासाठीची वार्षिक उत्पन्नाची अटच काढून टाकावी अशी मागणी पुरोगामी संघर्ष परिषदेच्या महिला आघाडीच्या कोल्हापूर जिल्हा अध्यक्षा सौ. साबेरा इंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकारद्वारे केली आहे.

सौ. इंगळे यांनी प्रसिद्धी पत्रकात पुढे म्हटले आहे की, शासकीय पातळीवर मागासवर्गीय महिला, विधवा, परीतक्त्या व भूमिहीन महिलांना मिळत असलेल्या अनेक पेन्शन योजना बंद असून तशा अनेक महिलांच्या तक्रारी पुरोगामी संघर्ष परिषदेकडे लेखी स्वरूपात आल्याचेही म्हटले आहे.सदर तक्रारी ह्या गंभीर स्वरूपाच्या असून त्याची शासकीय पातळीवर तातडीने चौकशी होऊन ताबडतोब चालू कराव्यात अन्यथा पुरोगामी संघर्ष परिषदेच्या वतीने उग्र निदर्शने करण्यात येतील असा इशारा देण्यात आला आहे.



# वेणू गोपाल रेड्डी व डॉ.भारत पाटणकर, आ. विनयकोरे आणि संबंधित अधिकारी यांच्यासोबत व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे बैठक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : श्रमिक मुक्ती दलाच्या नेत्रुत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनचा ३८ वा दिवस व लाँग मार्चचा ८वा दिवस असून काल राज्याचे वनसचिव वेणू गोपाल रेड्डी व श्रमिक मुक्ती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष मा. डॉ.भारत पाटणकर मा.आमदार विनयची कोरे आणि संबंधित अधिकारी यांच्या सोबत विडीओ कॉन्फरन्स द्वारे बैठक झाली.

त्या बैठकीत डॉ पाटणकर म्हणाले आम्ही गेली ३०वर्ष तुमच्या वर विश्वास ठेवला पण आता प्रत्यक्ष काही प्रकल्पग्रस्तांना जमिन व पुर्वी १०.०००हजार रुपये घर बांधनी अनुदान वाटप केले ते वजा करुन उर्वरित रक्कम वाटप होणार नसेल तर लॉग मार्च चालू राहील त्यापुढे डॉ पाटणकर म्हणाले जर लाँग मार्च थांबवायचाअसेल तर किमान सुरवात म्हणुन प्रत्येक गावातील एका खातेदारांस जमिन विकत घेऊन द्यावी तरच आंदोलन तात्पुरते स्थगित करण्याचा विचार केला जाईल तसेच आज परत एकदा झालेल्या बैठकीचा आढावा घेऊन व वनमंत्र्यांशी चर्चा करून एक ते दोन दिवसांत पुन्हा बैठक लावु असे आमदार वमखजई मंत्री विनयरावजी कोरे म्हणाले तसेच डॉ भारत पाटणकर यांच्या नेतृत्वाखाली आम्हीही आमचा लढा पुढे मोठ्या ताकदीने चालु ठेवुन विजय मिळाल्यावरच आमच्या घरी परतु असे आंदोलकांनी ही ठणकावून सांगितले.आज आंदोलनात डि के बोडके, मारुती पाटील ,नजिर चौगुले, दाऊद पटेल, जगन्नाथ कुडतुडकर, विनोद बडदे ,एम डी पाटील, प्रमिला नांगरे ,अमिना पटेल यासह स्त्री पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बोगस बांधकाम कामगार नोंदणी करून शासनाची दलालांमार्फत लूट

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळा अंतर्गत बोगस बांधकाम कामगारांची नोंदणी करून शासनाची दलालांमार्फत कोट्यावधी रुपयांची लूट सुरू आहे. याबाबत चौकशी करून कार्यवाही करावी अशी मागणी शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने करण्यात आले आहे. यासंदर्भात सहाय्यक कामगार आयुक्तांना निवेदन देण्यात आले.



निवेदन म्हटले आहे,वरील योजनेअंतर्गत बांधकाम कामगार व इतरांना सक्षम करण्यासाठी विविध करांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात अनेक सुविधा दिल्या जातात जेणेकरून ते व त्यांचे कुटुंबीय सर्व स्तरावर सक्षम व्हावेत. अशा कुशल प्रामाणिक कामगार यांना भरपूर सुविधा मिळाल्याच पाहिजेत या मताशी आम्ही सहमत आहोत.गेल्या काही वर्षापासून सत्ताधारी लोकप्रतिनिधी व त्यांचे पदाधिकारी बोगस शिक्के मारून बोगस कामगारांची नोंद केली जात आहे.

त्यात आपला व आपल्या कर्मचाऱ्यांच्या सुद्धा सहभाग असल्याशिवाय हे सर्व शक्य नाही. बोगस नोंदणीमुळे विनाकारण शासनाची कोट्यावधी रुपयांची लूट होत असून काही राजकीय मंडळी आपला मतदार संघ सक्षम करण्यासाठी व मतदान वाढवण्यासाठी संबंधित खात्याचा दुरुपयोग करीत आहेत.जे ठेकेदार ( सिव्हिल इंजिनियर) शिक्के मारून आपले कामगार किती आहेत याची आपल्याकडे यादी पाठवतात त्यातील काही ठेकेदार जे सत्य आहे तेवढ्याच कामगारांची यादी आपल्या सही शिक्क्यानिशी पाठवतात. परंतु तेथे आपल्या कार्यालयातील काही दलाल व कर्मचारी बोगस सही शिक्के मारून लाभार्थी कामगारांची यादी मोठ्या प्रमाणात वाढवतात. आपणास विनंती आहे या सर्व प्रकाराची माहिती लवकरात लवकर जाहीर करावी व होणारी शासनाची लूट थांबवावी अन्यथा आपल्या विरुद्ध वरिष्ठ पातळीवर आपली चौकशी करून निलंबनाची मागणी करण्यात येईल असा इशारा देण्यात आला. यावेळी ठाकरे गटाचे उपनेते व जिल्हाप्रमुख संजय पवार,विजय देवणे, रविकिरण इंगवले, सुनील मोदी, त्याच्यासह पदाधिकाऱ्या उपस्थित होत

# नविन वाहनांमुळे कायदा व सुव्यवस्था राखण्यास मदत होईल



**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : जिल्हा नियोजन समितीतून सांगली पोलीस दलाला एकूण नविन २२ वाहने प्राप्त झाली आहेत. यामुळे पोलीस विभाग अधिक सक्षम होईल. या वाहनांमुळे कायद्या व सुव्यवस्था राखण्यास निश्चित मदत होईल. असा आशावाद पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी व्यक्त केला.

जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून सांगली जिल्हा पोलीस दलास प्राप्त वाहनाच्या लोकार्पण सोहळा कार्यक्रम प्रसंगी ते बोलत होते.

यावेळी खासदार संजयकाका पाटील, आमदार अरुण लाड, आमदार सुधीर गाडगीळ, आमदार सुमनताई पाटील, आमदार मानसिंगराव नाईक, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, पोलीस अधिक्षक संदीप घुगे, जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून पोलीस दलासाठी एकूण २२ वाहने तर पोलीस महासंचालक कार्यालय यांच्याकडून १० दुचाकी वाहने प्राप्त झाली आहेत. पोलीस मुख्यालयाच्या प्रांगणावर पार पडलेल्या या कार्यक्रमासाठी जिल्हा नियोजन अधिकारी अशोक पाटील, सत्यजित देशमुख यांच्यासह पोलीस दलातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# वन्यप्राणी बंदोबस्तास तारेचे कुंपण प्रस्ताव मंत्रालयात अंतिम मंजुरीस पाठवण्याचा निर्णय

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : चांदोली वन्यजीव नागरी वस्तीत येणार नाहीत असा बंदोबस्त करून नागरी वस्तीकडील भागास ,अभयारण्याच्या हद्दीवर तारेचे कुंपण करण्यासह इतरप्रमुख मागाण्यांचा प्रस्ताव मंत्रालय पातळीवर आंतरिम मंजुरीसाठी पाठविण्याचा निर्णय आज कोल्हापूर येथे मुख्य वन संरक्षक यांचे सोबत श्रमिक मुक्ती दल आणि आंदोलक प्रतिनिधी बैठकीत मुख्य वन संरक्षक रामानुजम यांनी दिला.

यावेळी शिराळ्या चे माजी सभापती हणमंतराव पाटील, श्रमिक मुक्ती दलाचे राज्य सदस्य वसंत पाटील,विभागीय वनाधिकारी दक्षता डी.वाय. भुर्के, विभागीय वन अधिकारी नियोजन ज. ल. शिंदे, चांदोली वनक्षेत्रपाल नंदकुमार नलवडे, श्रमुद राज्य सदस्य सखाराम पाटील,सरपंच सचिन मोरे,राम माने आदी उपस्थित होते. या बैठकीत१) अभयारण्यात अन्न साखळी तयार करणे२), ढेबेवाडी येथील चांदोली कार्यालय चांदोलीत आणणे,३) पुनर्वसित वसाहतीत जन वन समितीला नाकारणे बद्दल निषेध व्यक्त केला जनवन समिती स्थापन करावी. ४)वन्यजीव स्थलांतर अभ्यारण्यात करणे, ५)शेतीचे नुकसान थाबवणेस उपाय योजने. ६)चांदोली वन्यजीव कार्यालय वन्यजीव हद्दीत स्थलांतर करणे.७)हल्ल्यात जलद मदत,उपचार आणि नुकसान भरपाई सत्वर देणे. आदी प्रमुख मागण्यावर चर्चा होऊंन तोडगा काढण्याचा निर्णय झाला.

चांदोली अभयारण्यातील वन्य जीव नागरी भागात सतत येऊन मानवीजीवित हानी, पाळीव प्राण्यावरील हल्ले, शेतीचे प्रचंड नुकसान आणि नागरी भागात शेतकरी भीतीच्या छायेखाली जगत आहेत या पार्श्वभूमीवर २९फेब्रुवारी रोजी श्रमिक मुक्ती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. भारत पाटणकर, यांचे नेतृत्वाखाली शिराळा, कराड दक्षिण, पाटण शाहूवाडी तालुक्यातील चांदोली वन्यजीव कार्यालयावर मोर्च्या काढण्यात आला होता. त्यामुळे वन्यप्राण्यांचे होणारे जिवघेणे हल्यावर तोडगा काढण्यासाठी आज कोल्हापूर मुख्य वन संरक्षक रामानुजन यांचे अध्यक्षते खाली श्रमिक मुक्ती दलाची बैठक झाली. दरम्यान चांदोलीच्या पाण्यासाठी मणदूर येथे सुरु असलेले ठिय्या आंदोलन आज तिसऱ्या दिवशी सुरु असून धरणावर पाणी भेट जाणेचा निर्णय उद्या डॉ भारत पाटणकर यांचे नेतृत्वाखाली आंदोलन स्थळी घेतील.याचवेळी आंदोलची पुढील दिशा ठरवतील अशी माहिती निमंत्रक श्रमुद राज्य सदस्य वसंत पाटील यांनी दिली.



# आम्हाला ३९ दिवस लढा करावा लागत असेल तर तुम्हालाही आम्ही धडा शिकवू

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

शिराळा : कोल्हापूर जिल्ह्यातील चांदोली अभयारण्य ग्रस्ताचा ठिय्या आंदोलनाचा ३९दिवस आणि लाँग मार्च चा ९ वा दिवस असून आज खिरवडेता.शिराळा येथे दुपारी जेवणाच्या वेळी डॉ. श्रमिक मुक्ती दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ भारत पाटणकर यांनी भेट दिली या प्रसंगी झालेल्या सभेत बोलत होते. यावेळी श्रमिक मुक्ती दलाचे राज्य निमंत्रक डी. के. बोडके, कोल्हापूर जिल्हाध्यक्ष मारुती पाटील, वसंत पाटील,,दाऊद पटेल संतोष गोटल आदी प्रमुख उपस्थित होते.

डॉ. पाटणकर पुढे म्हणाले की,अभयारण्य ग्रस्तजनतेच्या प्रश्नाचेकडे तुम्ही लक्ष देत नसाल तुम्ही आमचे ऐकत नसाल तर आम्हीही काय करायचे ठरवू. तसेच माजी मंत्री आम. कोरे समवेत वने चे सचिव यांचेशी भ्रमणध्वनी द्वारे संपर्क केला असता घर बांधणी अनुदान आणि जमीन वाटप सुरुवात करतो असे पाच दिवसात करतो असे सांगितले तो शब्द पाळला घर अनुदान वाटपचे पुरावे ते दिले मग आता तरी वाटप करा ठाम भूमिका मांडली. आता पाहू नाहीतर पुढील निर्णय घेऊ नाही वेळ आलीतर राज्यातील धरण प्रकल्प ग्रस्त यात सहभागी होतील आणि मुंबईला सुद्धा हादरवून सोडू. असा इशारा दिला यावेळी जगन्नाथ कुडतूडकर पांडुरंग कोठारी, विनोद बडदे, दगडू बोडके, जिजाबाई पाटील, नाथाबाईसुतार, वजाबाई बडदे आदी आंदोलक स्त्री पुरुष बहू संख्येने सहभागी आहेत´

# बिसूर हायस्कूल बिसूर येथे जागतिक महिला दिन व हळदी कुंकवाचा कार्यक्रम संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

सांगली : बिसूर कशात नाही कसूर या बोधवाक्याप्रमाणेच नवभारत शिक्षण मंडळ संचलित बिसूर हायस्कूल बिसूर, बालविकास केंद्र बिसूर तसेच आस्था दिव्यांग केंद्र बिसूर यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच बिसूर हायस्कूल चे गुरुकुल विभागाचे गुरुवर्य माननीय टी.डी.पाटील सर यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित बिसूर हायस्कूलच्या पटांगणावर जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून या कार्यक्रमाची सुरुवात झाली. या कार्यक्रमासाठी




आलेल्या प्रवक्ते व पाहुण्यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच बिसूर गावची लेक नवनूतन तलाठी या पदावर म्हणून निवड झाली त्याचेही सत्कार करण्यात आले.या कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून सौ. पुष्पा पांडुरंग भोसले सेवानिवृत्त प्रशासकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

त्या म्हणाल्या या कार्यक्रमाची सुरुवात अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये स्वातंत्र्यासाठी, आपल्या हक्कासाठी,न्याय मागण्यासाठी काही कापड व्यवसायात काम करणाऱ्या महिलांनी आंदोलने केली आणि या आंदोलनाचा परिपाक म्हणून जागतिक महिला दिन साजरा करण्यासाठी काही इतर देशातील महिलांनी एकत्र येऊन जो लढा दिला त्या लढ्याचा परिपाक म्हणून महिला दिनाच्या कार्यक्रम त्या दिवसापासून साजरा करण्यात येत आहे.

महिला दिन साजरा करणे म्हणजे बैल पोळ्या साजरा करण्यासारखा आहे. म्हणजे बैलाला वर्षभर झोपलो जातं आणि बैल पोळ्या दिवशी त्याची शिंगे रंगवली जातात. त्या सिंगांना रेबिन बांधली जाते, पायात घुंगरू बांधले जातात, छान छान खाऊ घालतात आणि त्यानंतर वर्षभर घाण्याला जुपतात. ज्याला स्त्री आई म्हणून कळली तो जिजाऊचा शिवबा झाला. ज्याला स्त्री बहीण म्हणून कळली तो मुक्ताई चा ज्ञानदेव झाला. ज्याला स्त्री मैत्रीण म्हणून कळली तो राधेचा श्याम झाला. ज्याला स्त्री पत्नी म्हणून कळली तो सीतेचा राम झाला. प्रत्येक महान व्यक्तीच्या जीवनात यशात सिंहाचा वाटा असतो तो म्हणजे स्त्रियांचा. तसेच महिला पोलीस अधिकारी व निर्भय पथक प्रमुख सांगलीच्या छाया सुतळे मॅडम यांनीही मोलाचे मार्गदर्शन केले.

त्या म्हणाल्या, स्त्री आहे म्हणून घर आहे, ती आहे म्हणून हा सारा संसार आहे. महिलांनी आपल्या कामातून वेळ काढून एन्जॉय करावा. काम हे आपल्या जीवनाला बांधलेच आहे. आम्हीही नोकरी करतो घर सांभाळतो आणि मिळेल त्या वेळेत एन्जॉय ही करतो. जागतिक महिला दिनानिमित्त सर्व महिलांना एकत्र बघून व्यासपीठावर सर्व महिला पाहून मला खूप छान वाटले. खूप आनंद वाटला. मुलगी सासरी जाताना कशी जावी, आपण त्याला काय सांगावं, हे प्रत्येक आईने सांगितले पाहिजे.पण या जगात आता महिलांना मुलांना देण्यासाठी वेळ नाही.

# शिंगणापूर, हणमंतवाडी,नागदेववाडी परिसरातील विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही

## ४ कोटी ६३ लाख रुपयांच्या निधीतून होणाऱ्या विविध विकासकामांचा शुभारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

करवीर : तालुक्यातील शिंगणापूर, हणमंतवाडी आणि नागदेववाडी या गावांना जोडणारे प्रमुख रस्ते आणि समाजमंदिर बांधण्यासाठी ४ कोटी ६३ लाख रुपयांचा निधी खासदार धनंजय महाडिक आणि माजी आमदार अमल महाडिक यांच्या पाठपुराव्यामुळे मंजूर झाला आहे.या निधीतून होणाऱ्या विविध विकासकामांचा शुभारंभ खासदार महाडिक यांच्या हस्ते करण्यात आला. करवीर तालुक्यातील शिंगणापूर, हणमंतवाडी, नागदेववाडी परिसरातील विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.

करवीर तालुक्यातील शिंगणापूर, हणमंतवाडी आणि नागदेववाडी या गावांना जोडणाऱ्या रस्त्यांसाठी ४ कोटी ८ लाख रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. तसेच विविध योजनातून शिंगणापूर गावातील अंतर्गत रस्ते, गटर्स आणि व्यायामशाळा अशा विकासकामांसाठी ४ कोटी ६३ लाख रुपयांचा निधी खासदार धनंजय महाडिक यांच्या विशेष प्रयत्नातून



आणि माजी आमदार अमल महाडिक यांच्या पाठपुराव्यामुळे मंजूर झाला आहे. या निधीतून केल्या जाणाऱ्या विविध विकासकामांचे भूमीपूजन खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते झालं. या निधीतून शिंगणापूर फाटा ते हणमंतवाडी, बिरदेव मंदिर रस्ता, हणमंतवाडी ग्रामपंचायत ते शिंगणापूर जॅकवेल रस्ता, संभाजी चौगले घर ते नागदेववाडीपर्यंतचा रस्ता, नवबौध्द घटक सुधार योजनेतून बौध्द समाज मंदिरात व्यायाम साहित्य देण्यात येणार आहे. शिंगणापूर आणि आजूबाजूच्या गावातील विकासकामांना निधी मिळण्यासाठी दत्ता आवळे तसेच आपण सातत्याने महाडिक कुटुंबियांकडे पाठपुरावा केल्याचे, उपसरपंच सुवर्णा आवळे यांनी सांगितले. कोल्हापूरच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्नशील आहे. खासदारकी मिळाल्यापासून विमानतळ, रेल्वे, कोल्हापूर शहरातील रस्ते तसेच केएमटीच्या ताफ्यात १०० ई बस प्रकल्प मंजूर करुन आणला आहे. शिंगणापूर आणि पंचक्रोशीतील विकासकामांसाठी निधी कमी पडू देणार नाही, अशी ग्वाही खासदार धनंजय महाडिक यांनी दिली.

यावेळी सतीश चौगले, रवींद्र चौगले, आकाश निंबाळकर, सचिन जाधव, दीपक कांबळे, स्वाती पाटील, संगीता कलाल, दीपाली पाटील, हणमंतवाडीचे सरपंच तानाजी नरके, उपसरपंच समृध्दी पाटील, संग्राम भास्कर, संजय जाधव, बाळ पिंजरे, अमित पाटील, सरदार पिंजरे, नागदेववाडीचे राजू दिवसे, शिवाजी ढेरे, विवेक निगडे, अभिजीत निगडे, मधुकर जांभळे, बालिंगे सरपंच सुधा वाडकर, उपसरपंच पंकज कांबळे, संदीप सुतार, विकास माने, अशोक पाटील, किरण पाटील, महेश पाटील, अनिल धनवडे, चेतन साळोखे यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# जि.प.प्राथमिक शाळा विरकरवाडीचा तृतीय क्रमांक

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

म्हसवड/प्रतिनिधी : माण तालुकास्तरीय स्वच्छ, सुंदर उपक्रमशील, गुणवत्ता पूर्ण विभागात जि.प.प्राथमिक शाळा विरकरवाडीचा तृतीय क्रमांक आला.

शाळेच्या भौतिक सुविधा, शालेय परिसर, विविध स्पर्धेतील यश, नाविन्यपूर्ण उपक्रम, शाळा व्यवस्थापन समिती आयोजित उपक्रम व विद्यार्थी केंद्रित उपक्रम, बचत बँक, वाचनालय या सर्व उपक्रमाची पाहणी करण्यात आली. त्यामध्ये शाळेने तृतीय क्रमांक मिळवून हे यश संपादन केले.



**म्हसवड : जि.प. प्राथमिक शाळा विरकरवाडीचा तृतीय क्रमांक आल्याबद्दल शाळेतील शिक्षकांचा सत्कार करताना उपस्थित मान्यवर**

मुख्याध्यापक सुशील त्रिगुणे, शाळा व्यवस्थापन अध्यक्ष विशाल विरकर, उपाध्यक्ष बाळराजे विरकर, सर्व सदस्य, शिक्षक अनिता तोरणे, कांतीलाल खाडे, पल्लवी जगताप, शुभांगी रणदिवे, पूनम शेंडे यांनी उपक्रम राबविण्यासाठी परिश्रम घेतले. स्पर्धेत यश मिळाल्याबद्दल उपजिल्हाधिकारी मुंबई जे. एम. विरकर, गटशिक्षणाधिकारी लक्ष्मण पिसे, शिक्षणविस्तार अधिकारी रमेश गंबरे, केंद्रप्रमुख बाळासाहेब पवार, अशोक गंबरे, माजी केंद्रप्रमुख जगन्नाथ विरकर, प्रा. विठ्ठल सजगणे यांनी अभिनंदन केले.

# फॅबटेक पॉलिटेक्निक मध्ये पालक मेळावा संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगोला : येथील फॅबटेक पॉलिटेक्निक कॉलेज मध्ये इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभागातर्फे विद्यार्थी पालक मेळावा आयोजित करण्यात आला. विद्यार्थी-पालक व शिक्षकांमध्ये संवाद व्हावा व विद्यार्थ्यांची प्रगती पालकांना समजावी या उद्देशाने मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. पालकांच्या स्वागताने कार्यक्रमाची सुरुवात झाल्यानंतर हिवाळी २०२३ परीक्षेत व घटक चाचणी १ परीक्षेत उज्वल यश संपादन केलेल्या तसेच नामांकित कंपनी मध्ये निवड झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे विभाग प्रमुख प्रा. महेश वाळुजकर यांनी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागातर्फे आयजीत करण्यात आलेले विविध उपक्रम, टेस्ट सिरीज, सामाजिक उपक्रम यासंदर्भात माहिती दिली. पॉलिटेक्निक चे प्राचार्य प्रा. तानाजी बुरुंगले यांनी यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांची हजेरी कमी असेल तर महाविद्यालयास शैक्षणिक गुणवत्ता पुरविण्यास अडचणी निर्माण होतात, त्यामुळे पालकांनी विद्यार्थ्यांच्या १०० टक्के हजेरी साठी महाविद्यालयास सहकार्य करण्याचे आवाहन केले.

यावेळी पालक प्रतिनिधी म्हणून दत्तात्रय ताटे व बायडाबाई तोंडले यांची निवड करण्यात आली. सदर कार्यक्रमाच्या सूत्रसंचालनाची जबाबदारी प्रा.गणेश शिंदे यांनी पार पाडली व आभार प्रदर्शन प्रा.कोमल पोळ यांनी केले. या पालक मेळाव्यासाठी इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन विभागाचे सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हा कार्यक्रम संस्थेचे चेअरमन भाऊसाहेब रुपनर, मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. अमित रुपनर, कार्यकारी संचालक दिनेश रूपनर, कॅम्पस डायरेक्टर डॉ.संजय आदाटे, संचालक डॉ.डि.एस. बाडकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला.

# लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेसची पहिली यादी जाहीर ; राहुल गांधी पुन्हा एकदा वायनाडमधून लढणार

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

नवी दिल्ली: आगामी लोकसभा निवडणुकीसाठी काँग्रेस पक्षाने पहिली यादी जाहीर केली आहे. काँग्रेसने शुक्रवारी ३९ जणांची पहिली यादी प्रसिद्ध केली असून यात राहुल गांधी यांच्या नावाचा समावेश आहे. राहुल गांधी हे पुन्हा एकदा केरळमधील वायनाड मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत.

केंद्रीय निवडणूक आयोगाकडून लोकसभा निवडणुकीची तारीख पुढील आठड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याआधी काँग्रेसने पहिली यादी जाहीर केली. राहुल गांधींसह पहिल्या यादीत छत्तीसगडचे माजी मुख्यमंत्री भूपेश बघेल यांच्या नावाचा समावेश आहे. ते राजनांदगावमधून निवडणूक लढवतील. दिल्लीतील काँग्रेस मुख्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत महासचिव के.सी.वेणुगोपाल यांनी ही यादी जाहीर केली.

काँग्रेसच्या पहिल्या यादीत १५ जण हे खुल्या वर्गातील, २४ उमेदवार ड्उ, ड्ढ आणि जइउ व अल्पसंख्यांक वर्गातील आहेत.

पहिल्या यादीतील महत्त्वाचे उमेदवार

राहुल गांधी- वायनाड

शिवकुमार दहिया- जांजगीर चांपा

भूपेश बघेल- राजनांदगांव

शशी थरूर- तिरुवनंतपूरम

डीके सुरेश- बेंगळुरू ग्रामीण

गेल्याच आठवड्यात भाजपने १९५ जणांची पहिली यादी जाहीर केली होती. ज्यात महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचा समावेश नव्हता. आता काँग्रेसने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत देखील महाराष्ट्रातील एकाही उमेदवाराचा समावेश नाही. काँग्रेसने केरळमधील सर्वाधिक म्हणजेच १५ उमेदवार जाहीर केले आहेत.

पहिल्या यादीतील राज्ये आणि उमेदवारांची संख्या

छत्तीसगड- ०६, कर्नाटक- ०७, केरळ- १६, तेलंगणा-०४ , त्रिपूरा- ०१, सिक्कीम- ०१, नागालँड- ०१, मेघालय-०१, लक्षद्वीप- ०१,

काँग्रेसच्या पहिल्या यादीत १२ उमेदवार असे आहे ज्यांचे वय ५० पेक्षा कमी आहे. ८ उमेदवार असे आहेत ज्यांचे वय ५० ते ६० दरम्यान आहे. १२ उमेदवारांचे वय ६१ ते ७० दरम्यान तर ७ उमेदवारांचे वय ७१ ते ७६ दरम्यान आहे. काल (गुरुवारी) काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची बैठक झाली होती. या बैठकीस काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, सोनिया गांधी, सचिन पायलट आदी नेते उपस्थित होते. राहुल गांधी सध्या भारत जोडो न्याय यात्रेत असल्याने ते या बैठकीस उपस्थित राहू शकले नाहीत.

# देशाच्या विकासासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा प्रचंड मतांनी विजयी करूया :खा:धनंजय महाडिक

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : जागतिक पातळीवर भारताची अर्थव्यवस्था उंचावण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे आणि याला तुम्ही साक्षिदार आहात. त्यामुळे देशाच्या विकासासाठी मोदींना तिसऱ्यांदा निवडून देऊया आणि पुन्हा देशाची सत्ता भाजपकडे देऊया, असे आवाहन खासदार धनंजय महाडिक यांनी केल कागल तालुक्यातील वाळवे खुर्द येथे विविध विकास कामांच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कागल तालुक्यातील वाळवे खुर्द गावासाठी ४ कोटी ९९ लाख रुपयांचा विकास निधी खासदार धनंजय महाडिक यांनी दिला आहे. त्यातून विविध विकास कामांचे उद्घाटन खासदार धनंजय महाडिक यांच्या हस्ते करण्यात आले. गावच्या विकासासाठी भरीव निधी दिल्याबद्दल ग्रामस्थांनी खासदार धनंजय महाडिक यांचा गौरव केला. यावेळी खासदार धनंजय महाडिक म्हणाले. महाराष्ट्र राज्य प्रादेशिक पर्यटन विकास निधीतून हा निधी दिला असून याचा पाठपुरावा माजी जिल्हा परिषद सदस्य भूषण पाटील आणि माजी उपसरपंच भरत पाटील यांनी केला असल्याचे त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे शेतकरी, महिला, उद्योजक, खेळाडू अशा सर्व क्षेत्रात भारताने प्रगती केली आहे.

त्यामुळे जागतिक पातळीवर भारताची अर्थव्यवस्था उंचावली आहे. मोदी यांनी देशाचा केलेला विकास वाखाणण्याजोगा असून त्यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी सर्वांनी



भाजपाला साथ द्यावी असे आवाहन खासदार महाडिक यांनी केले. पुढील काळात विकास कामांची चिंता करू नका, सर्वच विकासकामे मार्गी लावून गावचा चेहरामोहरा बदलणार असल्याचे त्यांनी सांगितले तर तसेच येत्या निवडणुकीत भाजपला बळकट करण्यासाठी पक्ष जो उमेदवार देईल. त्याला प्रचंड मतांनी विजयी करूया, असे आवाहनही त्यांनी केलं. यावेळी माजी जिल्हा परिषद सदस्य भूषण पाटील म्हणाले महाडिक घराण्याचे दातृत्व मोठे आहे. समाज हिताच्या कामात त्यांनी कधीच राजकारण आणले नाही, असे सांगितले. यावेळी महिलांनीही खासदार धनंजय महाडिक यांचा सत्कार केला. कार्यक्रमाला सरपंच संगीता बोडके, माजी सरपंच भरत पाटील, सतीश माने, हणमंत सुतार, विमल बोडके, सुनीता माने, वनिता जाधव,सर्जेराव डाफळे यांच्यासह ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# रोहित पवार यांच्या कारखान्यावर ईडीची कारवाई

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

पुणे :राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांच्या बारामती ग्रो लि. कारखान्यावर काही दिवसांपूर्वी ईडीने धाड टाकून चौकशी केली होती. याबद्दल रोहित पवार यांना ईडीच्या कार्यालयात चौकशीसाठी पाचारणही करण्यात आले होते. त्यानंतर आज ईडीने मोठी कारवाई केली आहे. 'बारामती ग्रो लि.' कंपनीची मालकी असलेल्या 'कन्नड सहकारी कारखाना लि.' या कारखान्याची १६१.३० एकर जमीन, प्लांट, यंत्र आणि इमारत इत्यादींवर जप्तीची कारवाई केली आहे. या संपत्तीची एकूण रक्कम ५०.२० कोटी असल्याचे ईडीने सांगितले आहे. या कारवाईनंतर रोहित पवार यांनीही एक्स अकाऊंटवर पोस्ट टाकत याबाबत भूमिका व्यक्त केली आहे. तसेच भाजपामध्ये जायला हवं का? असा प्रश्नही उपस्थित केला आहे.

ईडीने त्यांच्या एक्स अकाऊंटवर पोस्ट टाकून याबाबत भाष्य केले आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेकडून 'बारामती ग्रो लि.'कडे अनधिकृतपणे 'कन्नड सहकारी कारखाना लि.' या कारखान्याची मालकी दिली गेली, असा आरोप ईडीने केला आहे.

# महापालिकेच्या बेजबाबदार कारभारावर आप चे आसूड आंदोलन

**माणदेश एक्सप्रेस न्यूज**

कोल्हापूर : नागाळा पार्क येथील सृष्टी शिंदे या एकवीस वर्षीय तरुणीचा भटक्या कुत्र्याच्या चाव्याने रेबीज होऊन दुर्दैवी मृत्यू झाला. यानंतर शहरात संतापाची लाट उसळली. महापालिकेच्या बेजबाबदार कारभारामुळे तरुणीचा आरोप करत आम आदमी पार्टीने महापालिकेसमोर आसूड आंदोलन केले. पिसाळलेल्या कुत्र्याचा चावा सोसणाऱ्या नागरिकाकडे दुर्लक्ष करणाऱ्या मुजोर अधिकाऱ्यावर कोल्हापूरकर आसूड ओढतानाचे प्रतिकात्मक आंदोलन करून आप ने महापालिकेचा निषेध केला.



भटक्या कुत्र्यांची व्यवस्था करण्यासाठी महापालिकेची यंत्रणा तोकडी आहे. दोन डॉग वॅन व फक्त बारा कर्मचाऱ्यांवर संपूर्ण विभागाची भिस्त आहे. निर्बीजिकरण करणे हा एकमेव परिणामकारक उपाय आहे. परंतु दिवसाला २-३ कुत्र्यांचेच निर्बीजिकरण होते. एका वर्षात सात हजार कुत्र्यांचे निर्बीजिकरण केल्याचा दावा खोटा असल्याचा आरोप आप चे प्रदेश संघटन सचिव संदीप देसाई यांनी केला. नागरिकांचा जीव जात असताना प्रशासकांनी बघ्याची भूमिका न घेता जबाबदारी निश्चित करून गांभीर्य नसलेल्या संबंधित पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांना निलंबित करावे अशी मागणी देसाई यांनी केली.

# रोहित शर्मा, शुभमन गिल यांची शतके

## टीम इंडियाकडे २५५ धावांची आघाडी : आठ बाद ४७३ धावा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

धर्मशाला : भारत आणि इंग्लंड यांच्यातील धर्मशाला येथे पाचव्या कसोटीच्या दुसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत टीम इंडियाने पहिल्या डावात आठ गडी गमावून ४७३ धावा केल्या आहेत. सध्या कुलदीप यादव २७ धावांवर आणि जसप्रीत बुमराह १९ धावांवर नाबाद आहे. इंग्लंडने पहिल्या डावात २१८ धावा केल्या होत्या. हे आव्हान पार करून टीम इंडियाने २५५ धावांची आघाडी घेतली आहे.

काल पहिल्या सत्रात भारताने ३० ओव्हरमध्ये विकेट न गमवता १३९ धावा केल्या. तर दुसऱ्या सत्रात २४ ओव्हरमध्ये २ विकेट गमावून ११२ धावा केल्या. चहापानानंतर तिसऱ्या सत्रात भारताने ३६ षटकांत ५ विकेट गमावून ९७ धावा केल्या.

कर्णधार रोहित शर्मा आणि शुभमन गिल यांनी शतके झळकावली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी १७१ धावांची भागीदारी करत भारताला २५० धावांच्या पुढे नेले. रोहितने त्याच्या कसोटी कारकिर्दीतील १८ वे शतक झळकावले आणि शुभमनने चौथे शतक झळकावले. या मालिकेतील दोघांचे हे दुसरे शतक ठरले.



ही भागीदारी बेन स्टोक्सने मोडली. नऊ महिन्यांनंतर गोलंदाजी करण्यासाठी आलेल्या स्टोक्सने या मालिकेत प्रथमच गोलंदाजी केली आणि पहिल्याच चेंडूवर रोहितला क्लीन बोल्ड केले. रोहितने १६२ चेंडूत १३ चौकार आणि तीन षटकारांच्या मदतीने १०३ धावांची खेळी केली. यानंतर जेम्स अँडरसनने शुभमन गिलला क्लीन बोल्ड केले. गिलला १५० चेंडूत १२ चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ११० धावा करता आल्या.

यानंतर सरफराज खान आणि नवोदित देवदत्त पडिक्कल यांनी चौथ्या विकेटसाठी ९७ धावांची भागीदारी केली. टी-ब्रेकनंतर इंग्लंडच्या बशीरने आक्रमक गोलंदाजी करत सर्फराजला बाद केले. एकेकाळी भारताची धावसंख्या तीन गड्यांच्या मोबदल्यात ३७६ धावा होती. यानंतर पुढील ५२ धावा करताना संघाने पाच विकेट गमावल्या.

सर्फराज बाद झाल्यानंतर पडिक्कलने आपले अर्धशतक पूर्ण केले. तो १० चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने ६५ धावा करून बाद झाला. त्यानंतर ध्रुव जुरेलही १५ धावा करून बाद झाला. या तिघांनाही शोएब बशीरने बाद केले. त्याचवेळी टॉम हार्टलेने रवींद्र जडेजा आणि आर अश्विनला बाद केले. जडेजा १५ धावा करून बाद झाला तर अश्विन खातेही उघडता आले नाही झाला. ५२ धावांत पाच गडी गमावल्यानंतर कुलदीप आणि बुमराहने ४५ धावांची नाबाद भागीदारी केली आणि २५० च्या पुढे आघाडी घेतली.

# सांगली जिल्ह्यात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

सांगली : विविध आंदोलने, आगामी सण, उत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था परिस्थिती अबाधित रहावी या करीता प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा एक भाग म्हणून जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी सन १९५१ च्या महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७(१)(३) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सांगली जिल्हा स्थलसिमा हद्दीत दि. ९ मार्च ते २३ मार्च २०२४ अखेर पर्यंत खालील कृत्ये करण्यास मनाई केली आहे.



**डॉ. राजा दयानिधी**

या आदेशानुसार शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या अथवा लाठ्या किंवा शारिरीक इजा करण्यासाठी वापरता येईल अशी इतर कोणतीही वस्तू बरोबर नेणे, कोणताही दाहक पदार्थ अथवा स्फोटक पदार्थ बरोबर नेणे, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे किंवा क्षेपणास्त्रे किंवा सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे किंवा साधने बाळगणे, जमा करणे आणि तयार करणे, व्यक्तीचे अथवा प्रेते किंवा आकृत्या किंवा त्यांच्या प्रतिमा यांचे प्रदर्शन करणे, जाहीरपणे घोषणा करणे, गाणी म्हणणे, वाद्ये वाजविणे या कृत्यांना मनाई केली आहे. तसेच ज्याच्या योगाने शांतता व सुव्यवस्था आणि सार्वजनिक मालमत्तेस धोका निर्माण होईल किंवा सभ्यतेला बाधा येईल अशा पध्दतीने हावभाव करणे, फलक चित्रे किंवा चिन्हे तयार करणे, त्यांचे प्रदर्शन करणे आणि प्रसारीत करण्यास मनाई केली आहे. जिल्ह्यात परवानगीशिवाय पाच किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्तीस सार्वजनिक ठिकाणी व रस्त्यावर एकत्र जमण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावीत असलेल्या शासकीय कर्मचारी, धार्मिक विधी, अंत्यविधी व परीक्षा यांना लागू राहणार नाही. हा आदेश दि. ९ मार्च २०२४ रोजीचे ०६.०० वाजल्यापासून ते दि. २३ मार्च २०२४ रोजीचे २३.५९ वाजेपर्यंत अंमलात राहील, असे आदेश जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी दिले आहेत.